प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०४.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशाद

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3550 दि: 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.५९३७/२०२५**
**बोर्ड क्र.३६**

श्री.आरूणा शंकर चांदणे, रा.H.No.C.५१९, पैठण रोड, हिंदुस्तान आवास, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त(मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| कार्यालयातील आरक्षित जागेवर लागलेली आस्थापना वरील अधिकारी कर्मचारी शासन सेवेत रूजु होताना सादर केलेली शैक्षणीक कागदपत्रांची संचिका, जातवैधता प्रमाण पत्र,जातीचे प्रमाणपत्र, टी.सी. सर्व्हीसबुकच्या प्रथम पानाची प्रतीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०४.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवर एकुण ३३२७ पोली अंमलदार कार्यरत आहेत. त्यांचे शासन सेवेत रूजु होतांना सादर केलेली शैक्षणीक कागदपत्रांची संचिका, जातवैधता प्रमाण पत्र, जातीचे प्रमाणपत्र, टी.सी. सर्व्हीसबुकच्या प्रथम पानाची प्रत ही माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने सदर माहिती मा.अ.अ.२००५ चे कलम ७(९) नुसार नाकारण्यात येत असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०४.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3551 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्र. २७७ ते २८३/२०२५**
**(एकुण ७ अपीले)**

श्री.राजेंद्र गुलाबसिंग जाधव, : **अपिलार्थी**
रा.१७/०२ बंजारा कॉलनी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर. **उपस्थित**

**विरुध्द**

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | उपस्थिती |
|---|---|---|
| ३७ ते ४३ | १. जन माहिती अधिकारी, माध्यमिक विद्यालय चिंचोली-एकोड, ता.जि.छत्रपती संभाजीनगर<br>२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय चिंचोली-एकोड, ता.जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१ **उपस्थित**<br>उत्तरवादी क्र.२ **उपस्थित** |

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.२०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ७ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ३७ | ३१.०८.२०२४ | शाळेतील लिपिक मनोज भिमसिंग चव्हाण यांचे मराठी, इंग्रजी टायपिंग, MSCIT प्रमाणपत्र व रजेबाबत. |
| ३८ | ३१.०८.२०२४ | माध्यमिक विद्यालय चिंचोली येथील लिपिक मनोज भिमसिंग चव्हाण यांचा वैयक्तीक मान्यताप्रस्तावाबाबत. |

| | | |
|---|---|---|
| ३९ | ३१.०८.२०२४ | शाळेतील लिपिक मनोज भिमसिंग चव्हाण यांनी त्यांच्या नियुक्ती दिनांकापासुन ते आजपर्यंत काढलेल्या विद्यार्थी सुचना रजिस्टरबाबत. |
| ४० | ३१.०८.२०२४ | शाळेतील लिपिक मनोज भिमसिंग चव्हाण यांनी त्यांच्या नियुक्ती दिनांकापासुन ते आजपर्यंत त्याच्या हस्ताक्षरात शालेय कामकाजासाठी शासकीय कार्यालयात दिलेल्या पत्राबाबत. |
| ४१ | ३१.०८.२०२४ | शाळेतील लिपिक मनोज भिमसिंग चव्हाण यांनी त्यांच्या नियुक्ती दिनांकापासुन ते आजपर्यंत त्याच्या हस्ताक्षरात विद्यार्थ्याचे शाळा सोडल्याचे दाखला तयार केल्याची प्रतबाबत. |
| ४२ | ३१.०८.२०२४ | शाळेतील लिपिक मनोज भिमसिंग चव्हाण यांनी त्यांच्या नियुक्ती दिनांकापासुन शाळेचे दैनंदिन खर्चाचे लिखान केलेले कॅशबुक, लेजरबुक, पावतीपुस्तके, हिशोबपत्रके इ.बाबत. |
| ४३ | ३१.०८.२०२४ | शाळेतील लिपिक मनोज भिमसिंग चव्हाण यांनी त्यांच्या नियुक्ती दिनांकापासुन त्यांच्या हस्ताक्षरात प्रवेशनिर्गम रजिष्टरवरील केलेल्या नोंदीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या विचाराधिन द्वितीय अपीलातील माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आंगतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१) (त्र) नुसार अपिलार्थीस देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ७ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।। ३

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र. 3570 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५८१/२०२५
बोर्ड क्र.४४

श्री.राजेंद्र गुलाबसिंग जाधव, रा.१९/२ बंजारा कॉलनी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रम शाळा बोकुड जळगांव, ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर. : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०५.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १६.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| महिला वस्तीगृह अधिका-यांचे सन २०१३ ते आजपर्यंत वेतन देयकाच्या सत्यप्रतीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जान्वये अपुर्ण माहिती दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये अभिलेखातील उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 3552 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१११८/२०२५
बोर्ड क्र.४५

श्री.राजेंद्र गुलाबसिंग जाधव, रा.१९/२ बंजारा कॉलनी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण डॉ.बाबसाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा छत्रपती संभाजीनगर | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण डॉ.बाबसाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा छत्रपती संभाजीनगर | : उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१७.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०१.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| प्रकाश रामसिंग चव्हाण (सहशिक्षक), माध्यमिक आश्रमशाळा, शिवगड तांडा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांचे सेवानिवृत्ती प्रस्तावाची सत्यप्रत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हि त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सदर माहिती मा.अ.अ.२००५ चे कलम ८(त्र) नुसार देता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी सुनावणी घेउन निर्णय पारीत केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3553 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१९७२/२०२५ ते १९७४/२०२५
बोर्ड क्र.४६ ते ४८

| | | |
|---|---|---|
| | श्री.राजेंद्र गुलाबसिंग जाधव, रा.१९/२ बंजारा कॉलनी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| | विरुध्द | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगांव (पांढरी), ता.जि.छत्रपती संभाजीनगर | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगांव (पांढरी), ता.जि.छत्रपती संभाजीनगर | : उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये ३ द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १७.०२.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

**द्वितीय अपील क्र.१९७२/२०२५** - श्री.तुळजाभवानी कला, वानिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय चित्तेपिंपळगांव ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील इ.१२ वी कला, वानिज्य, विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थी फेब्रु/मार्च २०२५ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेसाठी आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांचे परिक्षेचे प्रवेशपत्राची सत्यप्रत.

**द्वितीय अपील क्र.१९७३/२०२५** - श्री.तुळजाभवानी कला, वानिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय चित्तेपिंपळगांव ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील इ.१२ वी कला, वानिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी संबंधितांकडुन सादर करण्यात आलेले शाळा सोडल्याचे दाखले, प्रवेशपत्र, आधारकार्ड, इ.बाबत.

**द्वितीय अपील क्र.१९७४/२०२५** - मा.उच्च न्यायालय, खंडपीठ छ.संभाजीनगर यांच्या आदेशानुसार श्री.तुळजाभवानी कला, वानिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय चित्तेपिंपळगांव ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील इ.१२ वी कला, वानिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे फेब्रु / मार्च-२०२५ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ९रिक्षेचे आवेदनपत्रे भरलेल्या विद्यार्थ्यांची संपुर्ण यादी, परिक्षा शुल्क भरल्याची पावतीबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.०३.०२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ व मा.अ.अ.२००५ चे कलम ८(१)(त्र) नुसार नाकारलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१) (त्र) नुसार अपिलार्थीस देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ३ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3554 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५३६/२०२५
बोर्ड क्र.४९

श्री.वृषभ सदाशिव इंगळे, शास्त्रीनगर, भुसावळ रोड, जामनेर जि.जळगांव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा चापानेर, ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर. : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| प्राथमिक आश्रमशाळा चापानेर ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेश, साहित्य, स्टेशनरी खरेदी करण्यात आलेल्या बिलांच्या पावत्या व इतर ३ मुद्दयांची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता आयोगापुढे अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यांनी त्यांच्या आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही, माहितीपासुन वंचित, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०६.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ०८ दिवसात उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम अपील आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा चापानेर, ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर. यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3555 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५९३४/२०२५
बोर्ड क्र.५०

श्री.कैलास शाम आढे, प्लॉट क्र.सी-११०६, ११ वा मजला, निर्माण अल्टीस, रॅडीसन हॉटेलच्या पाठीमागे, खराडी, पुणे - ४११०१४ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा छत्रपती संभाजीनगर विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा छत्रपती संभाजीनगर विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०९.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मौजे झाल्टा ता.जि.छ.संभाजीनगर येथील गट क्र.८३ मधुन जाणा-या जुना बीड बायपास रोड या रस्त्याची दि.०१.११.२०२३ पुर्वीची व नंतरची रुंदी मंजुर असलेल्या आदेश/पत्र/शासन निर्णय/परिपत्रके इ. व इतर २ मुद्दयांबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान आयोगापुढे कुणीही उपस्थित नाही. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जातील मागणी केलेल्या माहितीचा मा.अ.अ.२००५ चे कलम २(च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येत समावेश होत नाही. त्यामुळे सदर माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 3556 दि. 13/03/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.२३२६/२०२५
बोर्ड क्र.५६

| | | |
|---|---|---|
| | श्री.गिरीश म.यादव, पंचमुखी हनुमान मंदीराजवळ, लक्ष्मी नारायण चौक, मोदीखाना, सदरबाजार, जालना | अपिलार्थी |
| | विरुध्द | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा अग्निशमन विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना | : उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०२.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जालना शहर महानगरपालीका अग्निशमन व आपतकालीन सेवा कार्यालयात वाहन क्र.MH-२१ L०१५३ या वाहनाचीकाम केलेली माहिती, नोंदणी पुस्तक मर्यादा कालावधी, मिटर दुरूस्तीवर खर्च करण्यात आलेल्या खर्चाची माहिती इ.बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०३.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर दि.०२.०५.२०२५ रोजी सुनावणी घेउन निर्णय पारीत करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०३.२०२५ रोजी उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3557 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४६७८/२०२५
बोर्ड क्र.५७

श्री.संतोष पंजाबराव लहाने, — अपिलार्थी
रा.जवखेडा (ढेंगे), ता.जाफ्राबाद जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २६.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.२५.०७.२०२५ रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार ग्रा.पं.जवखेडा (ढेंगे) येथील नमुना नं.८ मिळकत क्र.२६७, २६८ मध्ये दुरूस्तीबाबत तपशिल. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद जि.जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./3558 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.१८०८/२०२५**
**बोर्ड क्र.५८**

ॲड.उगले मोहन सुदाम, — अपिलार्थी
रा.कोठाळा (खुर्द), ता.अंबड जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोठाळा खुर्द ता.अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २४.०१.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| Information of Financial Record, Developmental Works, Audit Reports,Grievance Redressal Mechanism |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांमध्ये अपिलार्थी यांचे दि.२७.०१.२०२६ रोजीचे आयोगास उद्देशुन दिलेले निवेदन दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी सदर निवेदनामध्ये माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली असुन सदर माहितीने माझे समाधान झालेले आहे, असे स्वाक्षरीत नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3559 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१३५/२०२५
बोर्ड क्र.५९

श्री.दत्ता विठ्ठलराव जोगदंड, रा.जेपीसी बँक कॉलनी, रामनगर जालना, ता.जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर रचना विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.२६.०८.२०२४ रोजी श्री.विजयकुमार बालकिसन केचाळे, रा.जेपीसी बँक कॉलनी जालना यांनी मनपाची परवानगी न घेता अधिकचे अतिक्रमण केलेले आहे. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

५/२/२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./ 3560 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१४१/२०२५
बोर्ड क्र.६०

श्री.दत्ता विठ्ठलराव जोगदंड,
रा.जेपीसी बँक कॉलनी, रामनगर जालना, ता.जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर रचना विभाग,
जालना शहर महानगरपालीका, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त,
जालना शहर महानगरपालीका, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.२६.०८.२०२४ ला केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ अधिनियम खालील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले अपील व त्यावरील सुनावणी बाबतचा निकालाची प्रत व केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत तसेच आज पर्यंत गुन्हा दाखल केलेल्या अतिक्रमण धारकांची संचिका. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) ५/२/२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3561 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४७६/२०२५
बोर्ड क्र.६१

श्री.किशोर वसंतराव वाघमारे, C/o श्री.झेरॉक्स जिल्हा परिषद पाठीमागे, जालना. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २४.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.०३०६.२२ रोजी सादर केलेल्या अर्जाचा दैनीक प्रगती अहवाल व इतर बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२७.०१.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.०१.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) २/२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./3562 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.२१३१/२०२५ व २१३२/२०२५**
**बोर्ड क्र.६२ व ६३**

श्री.संतोष सखारामजी गाढे, खडकपुरा, जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०८.२०२४ व ४.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| **द्वितीय अपील क्र. २१३१/२०२५** |
| जालना शहर महानगरपालीका इमारत बांधकाम परवानगी व स्ट्रक्चरल ऑडीटबाबत. |
| **द्वितीय अपील क्र.२१३२/२०२५** |
| जालना मनपा अंतर्गत शहरात बांधण्यात झालेले सिमेंट रोड, अंडरग्राउंड/ भुमिगत गटार कामांबाबत बांधकाम विभागाकडुन लेखा विभागास सादर करण्यात आलेल्या एकुण देयके/बिले बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या विचाराधिन द्वितीय अपीलातील दोन्ही माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना व्यक्तीश: माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.०१.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे व्यक्तीश: माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांची माहिती मिळाल्याबाबत व समाधान झाल्याबाबत स्वाक्षरीत पोच आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) ५/२/२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3563 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.३२७४/२०२५
बोर्ड क्र.६४

श्री.सिद्धार्थ केरूजी मोरे,
रमाबाई नगर, रेल्वे स्टेशन जवळ, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा विद्युत अभियंता,
जालना महानगरपालीका, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त,
जालना शहर महानगरपालीका, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १३.०२.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| आपल्या कार्यालयाअंतर्गत विद्युत विभाग असुन त्यांनी जाने.२०२५ या कालावधी मध्ये नुतन वसाहत ते शनिमंदीर या उड्डानपुलावरील विद्युत खांबाला तिन रंगाची एल.ए.डी लाईट लावली असुन ती कोणत्या योजनेतुन लावण्यात आली आहे इ.बाबत |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे व्यक्तीश: माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार माहिती तयार करण्यात आली. मात्र अपिलार्थी माहिती घेण्यास गैरहजर असल्याने सदर माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे व्यक्तीशः माहितीची मागणी केल्याचे दिसुन येत आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीचे शुल्क ज्ञात करून घेणे, माहिती प्राप्त करून घेणे इ. घडामोडी स्वतः हुन ज्ञात करून घेणे अर्जदाराचे उत्तरदायीत्व असते. मात्र असे उत्तरदायीत्व याप्रकरणी अपिलार्थी यांनी पार पाडले असल्याचे आयोगापुढील कागदपत्रांवरून दिसुन येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी आयोगापुढे अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करून घेण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3564 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.३५३९/२०२५
बोर्ड क्र.६५

श्री.अब्दुल रज्जाक रहेबर, रा.खडकपुरा जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, जालना महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| शहरातील खडकपुरा येथे सोडुन देण्यात आलेल्या भुमिगत गटार कामाबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२८.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे व्यक्तीश: माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांची माहिती मिळाल्याबाबत स्वाक्षरीत पोच आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./3565 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.३५५३/२०२५,
बोर्ड क्र.६६

श्री.अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, — अपिलार्थी
मोरंडी मोहल्ला जुना जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, अभिलेख विभाग, जालना महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३०.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०३.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे बांधकाम परवानाबाबत माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांनी अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 3573 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.३३६४/२०२५ व ४१५५/२०२५
बोर्ड क्र.६७ ते ६८

श्री.अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, मोरंडी मोहल्ला जुना जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा रमाई घरकुल विभाग प्रमुख विभाग, जालना महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०७.२०२५, १५.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०२.२०२५, १९.०३.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| **द्वितीय अपील क्र.३३६४/२०२५-** लाभार्थीने रमाई घरकुल मिळण्यासाठी सादर केलेले प्रस्तावासमोर संलग्न कागदपत्राची मुळ संचिकेची सांक्षाकीत प्रती व इतरबाबत. |
| **द्वितीय अपील क्र. ४१५५/२०२५-** दि.२४.०२.२०२५ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी द्वितीय अपील क्र.३३६४/२०२५ मधील माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. तसेच द्वितीय अपील क्र. ४१५५/२०२५ मधील माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरूपाची असुन अशा माहितीचा कलम २(च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येत समावेश होत नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी दोन्ही माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरूप लक्षात घेता, अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./3566 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.३६७४/२०२५
बोर्ड क्र.६९

| | |
|---|---|
| श्री.मनोज शशिकांत पटवारी, घर क्र.१.६.३२ खर्डेकर कॉम्प्लेक्सजवळ, जेईएस कॉलेज रोड, जालना | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा कर अधिकारी, जालना महानगरपालीका, जालना | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना | : उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०७.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १२.०३.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| महाराष्ट्रातील महापालीकेच्या पाणी, सांडपाणी कर आणि घर कर आणि मालमत्ता कर इ.करांच्या आकारणीपासुन दिव्यांग व्यक्तींना सुट देण्याबाबतची तरतुद व इतर बाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी आयोगापुढे गैरहजर आहेत. तथापि त्यांनी त्यांच्या आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०४.०७.२०२५ रोजी सुनावणी घेउन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये दि.०१.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती दिल्याने अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे आदेश पारीत केलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश विचारात घेता, सदर प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २॥३

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3571 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.३८०३/२०२५
बोर्ड क्र.७०

श्री.अरूण रामलाल पवार, — अपिलार्थी
रा.सुकापुर नवीन पनवेल जि.रायगड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचना विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०३.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जा.क्र.जाशम/नरवि/२०२४/६४७९ दि.२३.१२.२०२४ च्या कार्यालयाच्या पत्राच्या अनुषंगाने कार्यालयीन कर्मचा-याने केलेल्या कार्यवाहीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी आयोगापुढे गैरहजर आहेत. तथापि त्यांनी त्यांच्या आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०३.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3572 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.३८९५/२०२५, ३८९६/२०२५, ३९००/२०२५**
**बोर्ड क्र.७१ ते ७३**

श्री.किशोर प्रभाकर पाखरे, मु.पो.रेवगांव ता.जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा विद्युत अभियंता, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा अति. आयुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये ३ द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १६.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| **द्वितीय अपील क्र.३८९५/२०२५** |
| सन ०१.०१.२०२२ ते १६.०६.२०२५ या कालावधीमध्ये एकुण किती वाहनावर झालेला रिपेरिंग खर्च इ.बाबत. |
| **द्वितीय अपील क्र.३८९६/२०२५** |
| सन १ जाने.२०२२ ते १६.०६.२०२५ पर्यंत वाहनाच्या इंधनावर झालेला खर्च व इतरबाबत |
| **द्वितीय अपील क्र.३९००/२०२५** |
| दि.१ जाने.२०२२ ते १६.०६.२०२५ पर्यंत इंधन,टायरटुब, रिपेरिंग खर्च, GST बील खर्चबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या विचाराधिन द्वितीय अपीलांतील माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली बहुतांश माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९)

नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ३ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २११३

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3567 दि. 13/03/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४४०५/२०२५
बोर्ड क्र.७४

श्री.दत्ता विठ्ठलराव जोगदंड, रा.जे.पी.सी.बँक कॉलनी, रामनगरजवळ, नवा जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचना विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा अति. आयुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १३.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.१३.०५.२०२५ रोजी आपल्या कार्यालयात अभ्यंगतांना अभिप्राय नोंदविण्यासाठीच्या फॉर्म मध्ये नमूद अभिप्रायावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यन जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये दि.२५.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी आयोगापुढे अनुपस्थित आहेत. त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./3578 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४५१७/२०२५
बोर्ड क्र.७५

श्री.अजितदादा किसनलालजी कोठारी, प्रकाश रेसीडन्सी, लक्ष्मीनारायणपुरा, मस्तगड, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा भांडार विभाग प्रमुख, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| औषध खरेदी व वाटपासंबंधीची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यन जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये दि.१८.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी आयोगापुढे अनुपस्थित आहेत. त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3568 दि. 13/03/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५२०/२०२५
बोर्ड क्र.७६

श्री.विकासकुमार बागडी, — अपिलार्थी
नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा लेखा विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १५.०७.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| महाराष्ट्र एजन्सीने सादर केलेल्या बीलवर लेखा परिक्षण करत असतांना स्थानिक लेखा परिक्षक ने घेतलेले आक्षेप नोंद अनुसार केलेल्या कारवाईबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 3569 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५२९/२०२५
बोर्ड क्र.७७

श्री.मिनींटर प्रभुदास लालझरे, — अपिलार्थी
रा.एस.आर.पी.एफ गेट नं.३ समोर, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा आस्थापना विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०९.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दत्तकपत्र आधारे सफाई कामगार सेवा मिळवलेल्या सफाई कामगार यांच्या मुळ नियुक्ती संचिका व यादी मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./3574 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.५६६४/२०२५**

**बोर्ड क्र.७८**

सौ.निलम मनोज पटवारी, अपिलार्थी
घर क्र.१.६.३२ खर्डेकर कॉम्प्लेक्स जवळ, जेईएस महाविद्यालय मार्ग, जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| श्री.मनोज शशिकांत पटवारी यांनी भुसंपादन जाहिरातीच प्रलंबीत देयक मिळणेबाबतच्या दिनांक २५.०२.२०२५ रोजी दिलेले अर्जावर केलेली कार्यवाही व इतर २ मुद्दयांची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी सुनावणी घेउन अपिलार्थी यांनी कार्यालयातील उपलब्ध संचिकेचे अवलोकन करून आवश्यक कागदपत्राबाबत कळविण्यात यावे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करून दयावी, असे आदेश पारीत केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व त्यानुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश विचारात घेता, सदर प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./3575 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५९३८/२०२५
बोर्ड क्र.७९

श्री.तरंग लक्ष्मणराव कांबळे, — अपिलार्थी
फुलेनगर, अंबड जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा तहसिल कार्यालय, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २४.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| अंबड तालुक्यातील मंजुर नोंदणीकृत व कार्यरत वीट भट्टयांची यादी, त्यांचे परवाने, परवान्याची वैधता व इतर ५ मुद्दयांबाबत |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र. र. इं.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3576 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५१४१/२०२५
बोर्ड क्र.८०

| | |
|---|---|
| श्रीमती कल्पना डिंगाबर खरात पाटील, मु.पो.ढासला(महादेव मंदीराच्या बाजुला, ढासला) ता.बदनापुर जि.जालना | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, बदनापुर जि.जालना | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, बदनापुर जि.जालना | : उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०९.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| संजय गांधी निराधार योजनाअंतर्गत मौजे ढासला या गावातील माहे २०२१ ते जुलै २०२५ अखेर संजय गांधी निराधार योजना मंजुर अपंग लाभार्थी यांची यादी व इतर ३ मुद्दयांबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./3577 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.५४२९/२०२५ व ५४३०/२०२५**
**बोर्ड क्र.८२, ८३**

श्री.द्वारकेश रमण गायकवाड, — अपिलार्थी
गोपीकिशन बगडीयानगर, संतोषी माता मंदीरामागे, नवीन जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जल संधारण विभाग, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जल संधारण विभाग, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२६.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १२.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| **द्वितीय अपील क्र. ५४२९/२०२५ -** साहीत्यखरेदी बीलांबाबत. |
| **द्वितीय अपील क्र.५४२९/२०२५ -** साहीत्य दरपत्रकाबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 3590 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५४९३/२०२५
बोर्ड क्र.८४

ॲड.शैलेश चंद्रकांत देशमुख, — अपिलार्थी
रा.श्री.काळंका माता मंदीराजवळ, गांधी चमन, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ११.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| शिवाजी शिक्षण मंडळ, एफ-१४, जालना संचलीत कस्तुरबा गांधी विद्यालय, जालना चा मान्यता प्रस्ताव दाखल करताना दाखल केलेल्या प्रस्तावाच्या प्रती व इतरबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही, निर्णय पारीत केलेला नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार

देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कलम १९(८)(ग) व २०(१) च्या तरतुदीनुसार कारवाई का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दिनांक ०७.०४.२०२६ रोजी द्वितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह** सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन त्यांचेविरुध्द कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3156 दि. 6/3/2026

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५२१/२०२५
बोर्ड क्र.८५

श्री. दिनकर दगडुबा उखर्डे, मु.पो.टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.०९.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २००० ते ऑगस्ट २०२५ पर्यंतच्या बिंदुनामावली नोंदवहीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही, निर्णय पारीत केलेला नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार

देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कलम १९(८)(ग) व २०(१) च्या तरतुदीनुसार कारवाई का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नाव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दिनांक ०७.०४.२०२६ रोजी द्वितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह** सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन त्यांचेविरुध्द कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3157 दि. 6/3/2026

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित:

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५९७५/२०२५
बोर्ड क्र.८६

श्री.रंगनाथ बंडु साबळे,
रा.गोधंनखेडा, ता.जाफ्राबाद जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उच्च प्राथमिक शाळा, ब्रम्हपुरी केंद्र सिपोरा अ. ता.जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १८.०९.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| प्रवेश निर्गम उतारा मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे त्रयस्थ पक्षाची वैयक्तीक स्वरूपाची तसेच व्यापक जनहितीशी संबंधित नसलेल्या माहितीची मागणी केलेली असल्याने दि.२४.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मा.अ.अ.२००५ चे कलम ८ अन्वये मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 3588 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५९०६/२०२५
बोर्ड क्र.८७

श्री.रंगनाथ बंडु साबळे,
रा.गोधंनखेडा, ता.जाफ्राबाद जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, ब्रम्हपुरी ता.जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती जाफ्राबाद, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जन्मतारखेचा दाखला व रहीवाशी नोंदवहीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, ब्रम्हपुरी ता.जाफ्राबाद जि.जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली

आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती जाफ्राबाद, जि.जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./3589 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६०६०/२०२५
बोर्ड क्र.८८

श्री.संजय सुर्यकांत म्हस्के, — अपिलार्थी
रा.कोतवालपुरा खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| पेयजल योजना बाबुलतारा ता.परतुर या कामाचे १० टक्के देयक प्रलंबीत बाबत माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०१.२०२६ रोजी उपलब्ध करून दिलेली आहे. सदर माहितीने माझे समाधान झालेले आहे. करीता विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०१.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिलेली असल्याने विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे..

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 3591 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६०६६/२०२५, ६०६७/२०२५
बोर्ड क्र.८९ व ९०

श्री.विलास आसाराम कोल्हे, रा.गुरुपिंप्री ता.घनसावंगी जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, घनसावंगी जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, घनसावंगी जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १३.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

द्वितीय अपील क्र.६०६६/२०२५-

मौजे गुरूपिंप्री व आवलगांव खुर्द ता.घनसावंगी येथील शेतक-याला म.ग्रा.रो.ह.योजना अंतर्गत देण्यात आलेली फळ झाड, बांबु, तुती याबाबत क्षेत्रफळासहीत शेतक-याची यादी , अनुदान, हजेरीपत्रके, मोजमाप पुस्तीका इ.बाबत.

द्वितीय अपील क्र.६०६७/२०२५-

तालुक्यात शेतक-याला म.ग्रा.रो.ह.योजना अंतर्गत देण्यात आलेली फळझाड, बांबु, तुती याबाबत क्षेत्रफळासहीत शेतक-याची यादी , अनुदान, हजेरीपत्रके, मोजमाप पुस्तीका इ.बाबत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांच्या विचाराधिन द्वितीय अपीलातील दोन्ही माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व

मोठया कालावधीची असल्याचे दिसुन येत आहे. अशी मागणी एकत्रीत / संकलीत करण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामुग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागणार आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहितीचे अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाहीत.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र रा इं

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./3592 दि. 13/03/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६०६८/२०२५
बोर्ड क्र.९१

श्री.शरद लक्ष्मण पाडळे,
रा.वाकडी ता.भोकरदन जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.३१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २२.०९.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| वाकडी कुकडी ग्रा.पं.जनावरांचे गोठ्याचे, विहरीचे फोटो तपास करणा-या अधिका-याचे नावे, २०२०-२०२५ या कालावधीतील बीले इ.बाबत |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 3603 दि. 13/03/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६०३०/२०२५
बोर्ड क्र.९२

श्री.विलास किसनराव ढोले, — अपिलार्थी
रा.छत्रपती कॉलनी, धांडे नगर, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा समर्थ सहकारी बँक मर्यादीत, घनसावंगी जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा समर्थ सहकारी बँक मर्यादीत, घनसावंगी जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२९.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ११.१०.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| समर्थ सहकारी बँक मर्या.घनसावंगी येथील शाखेतील कर्जदारांबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, अपिलार्थी यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केलेली आहे. त्या संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरूपात प्राप्त होते किंवा कसे याबाबत अपिलार्थी यांना सुनावणी दरम्यान विचारणा केली असता, ते आयोगास काहीही सांगु शकलेले नाहीत किंवा तसा कोणताही सबळ पुरावा ते आयोगाच्या पटलावर सादर करू शकलेले नाहीत. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी ज्या सहकारी संस्थेकडे माहितीची मागणी केलेली आहे त्या सहकारी संस्थेचा अधिनियमातील कलम २(ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या

व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होणार नाही आणि पर्यायाने अशा संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागु होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./3602 दि. 13/03/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५८८/२०२५
बोर्ड क्र.९३

श्री.प्रकाश अशोक भुतेकर, — अपिलार्थी
रा.टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०८.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १०.०७.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| टेंभुर्णी येथील गट क्र.१६९ मधील जमीनीवरून गेलेल्या जिवनरेखाधरणाच्या कालव्याची पुर्व व पश्चिम बाजुची हद्दबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील

तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

